**नि. फौ. ख. क्र. १९/२०२५**
**शासन –वि.– सुर्यकांत मुपडे**
**नि.क्र.**

# <u>दोषारोप</u>

मी एस.एम.कोळेकर, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, धर्माबाद तुमच्यावर असा आरोप ठेवतो की,

तुम्ही आरोपी ....... **सुर्यकांत शंकर मुपडे,**
वय **२४ वर्षे**, व्यवसाय–
**रा.जारीकोट ता.धर्माबाद जि.नांदेड**

ज्याअर्थी तुम्ही आरोपीने दिनांक ११/०८/२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वाजताच्या सुमारास मौजे जारीकोट शिवारातील फिर्यादीचे शेतात तुम्ही जुन्या भांडणाच्या कारणावरुन लाकडाने फिर्यादीच्या डाव्या हातावर जब्बर मारुन हात फॅक्चर करुन गंभीर दुखापत केली. त्याअर्थी तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम ११८(२) अन्वये या न्यायालयाच्या दाखलगीरीत येणारा दंडणीय गुन्हा केला, तो मी दखलगीरीत घेण्याजोगा आहे.

वर नमूद, तारीख वेळ व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे तुम्ही कलम ११५(२) भारतीय न्याय संहिता अन्वये या न्यायालयाच्या दाखलगीरीत येणारा दंडणीय गुन्हा केला, तो मी दखलगीरीत घेण्याजोगा आहे.

वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादीस इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२ अन्वये या न्यायालयाच्या दाखलगीरीत येणारा दंडणीय गुन्हा केला, तो मी दखलगीरीत घेण्याजोगा आहे.

वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिताचे कलम ३५१(२) (३) अन्वये या न्यायालयाच्या दाखलगीरीत येणारा दंडणीय गुन्हा केला, तो मी दखलगीरीत घेण्याजोगा आहे.

आज दि. ०२ ऑगस्ट, २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(एस.एम.कोळेकर)
दि.०२/०८/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी धर्माबाद

दोषारोपातील मजकुर आरोपीला त्याच्या भाषेत वाचुन आणि समजावुन सांगितला.

SANJAY MARUTI KOLEKAR
Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR
Date: 2025.08.02 16:59:26 +0530

(एस.एम.कोळेकर)
दि.०२/०८/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी धर्माबाद